SMBT

# Dec 2023 Month News Coverage

# News Published CAR-T Cell Therapy

## लोकमत

# एसएमबीटीमध्ये कर्करोगावर अत्याधुनिक थेरपी यशस्वी

### अत्याधुनिक पद्धती : महागड्या उपचारावर भारतीय संशोधन

लोकमत न्यूज नेटवर्क

नाशिक : कर्करोग उपचारावर महत्त्वाची समजली जाणारी 'कार टी सेल' (CAR-T) थेरपी एसएमबीटी हॉस्पिटलच्या कॅन्सर इन्स्टिट्यूटमध्ये नुकतीच झाली. इम्युनोॲक्टच्या क्लिनिकल ट्रायल अंतर्गत व टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये ५० रुग्णांवर हे उपचार करण्यात आले. यातील दोन रुग्ण एसएमबीटी कॅन्सर इन्स्टिट्यूटमध्ये दाखल करण्यात आले होते. त्यांच्यावर ही थेरपी यशस्वी झाली. दोन्हीही रुग्णांवर चांगले परिणाम बघावयास मिळत असल्याची माहिती एसएमबीटीचे मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ. लविन विल्सन यांनी दिली.

टाटा मेमोरियल सेंटरच्या ब्लड कॅन्सर विभागाचे डॉ. हसमुख जैन यांच्यासह तज्ज्ञांच्या उपस्थितीत प्रिन्सिपल क्लिनिकल इन्व्हेस्टिगेशन करण्यात आले. कमीत-कमी खर्चात ब्लड कॅन्सर झालेल्या रुग्णांवर उपचार केले जाणार आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून आयआयटी मुंबई व टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये यावर संशोधन सुरु होते. अखेरीस या उपचार पद्धतीला मान्यता मिळाली असून, सुरुवातीला ५० रुग्णांवर सदर उपचार करण्यात आले. यातील दोन रुग्ण एसएमबीटी कॅन्सर इन्स्टिट्यूटमध्ये दाखल करून त्यांच्यावर ही थेरपी यशस्वी झाली. (वा.प्र.)



**एसएमबीटीत जानेवारीपासून सेल थेरपी**

जानेवारीपासून एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये सेल थेरपी युनिट (बीएमटी) युनिट सुरु करण्यात येणार आहे. तेव्हापासून प्रत्यक्षात रुग्णांवर उपचार सुरु होणार आहेत. त्यामुळे उत्तर महाराष्ट्रात आता कार टी-सेल थेरपी होणार असून, येथील निसर्गरम्य वातावरणात रुग्ण बरा होण्याचा दर यानिमित्ताने वाढणार असल्याचे तज्ज्ञ सांगतात.

Nashik Main
Page No. 3 Nov 30, 2023
Powered by: erelego.com

## दिव्य मराठी — नाशिक सिटी 02-12-2023

# एसएमबीटी रुग्णालयात कर्करोगग्रस्त रुग्णांवर कार- टी -सेल थेरपी यशस्वी



एसएमबीटी हॉस्पिटल व इम्म्युनोॲक्ट यांच्यातील कराराप्रसंगी एसएमबीटीचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ हर्षल तांबे. समवेत इम्म्युनोॲक्टचे डॉ. राहुल पुरवार, टाटा मेमोरियल हॉस्पिटलचे डॉ हसमुख जैन, डॉ. मीनल मोहगावकर व सचिन बोरसे आदी.

प्रतिनिधी | नाशिक

कर्करोग उपचारावर महत्वाची समजली जाणारी अत्याधुनिक 'कार टी सेल' थेरपी एसएमबीटी हॉस्पिटलच्या कॅन्सर इन्स्टीट्युटमध्ये नुकतीच पार पडली. 'इम्म्युनोॲक्ट'च्या क्लिनिकल ट्रायल अंतर्गत व टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये ५० रुग्णांवर हे उपचार करण्यात आले. यातील दोन रुग्ण एसएमबीटी कॅन्सर इन्स्टीट्युटमध्ये दाखल केले होते. त्यांच्यावर ही थेरपी यशस्वी झाली. दोन्हीही रुग्णांना चांगले परिणाम बघावयास मिळत असल्याची माहिती एसएमबीटीचे मेडिकल ऑन्कोलॉजीस्ट डॉ. लविन विल्सन यांनी दिली.

इम्म्युनोॲक्ट ही डॉ. राहुल पूरवार यांनी संशोधन केलेली पध्दती आहे. टाटा मेमोरियल सेंटरच्या ब्लड कॅन्सर विभागाचे डॉ. हसमुख जैन यांच्यासह तज्ञांच्या उपस्थितीत प्रिन्सिपल क्लिनिकल इन्व्हेस्टीगेशन करण्यात आले. गेल्या अनेक दिवसांपासून आयआयटी मुंबई व टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये संशोधन सुरु होते. अखेरीस या उपचार पद्धतीला मान्यता मिळाली आहे.

या उपचार पध्दतीत शरीरातील पांढऱ्या पेशींना औषधोपचारांच्या माध्यमातून रोगप्रतिकारक शक्तींमध्ये बदलले जाते. त्यामुळे या पेशी शरीरातील कर्करोग पेशींचा नाश करण्यासाठी काम करू लागतात. टी पेशी रुग्णाच्या रक्तातून गोळा केल्या जातात आणि मानवनिर्मित रिसेप्टरसाठी जनुक जोडून प्रयोगशाळेत अनुवांशिकरीत्या सुधारित केले जातात, ज्याला काइमरिक प्रतिजन रिसेप्टर किंवा 'सीएआर' म्हणतात. हे विशिष्ट कर्करोग पेशी प्रतिजन ओळखण्यात मदत करते. त्यानंतर, सीएआर टी पेशी रुग्णाला परत केल्या जातात. अशा माध्यमातून कार-टी सेल थेरपी कार्य करते.

## देशदूत

# एसएमबीटीत कर्करोगग्रस्त रुग्णांवर कार्टी–सेल थेरपी यशस्वी

नाशिक । दि २९ प्रतिनिधी

कर्करोग उपचारावर महत्वाची समजली जाणारी 'कार टी सेल' थेरपी एसएमबीटी हॉस्पिटलच्या कॅन्सर इन्स्टिट्युटमध्ये नुकतीच पार पडली. कर्करोगावर अद्ययावत उपचाराच्या दृष्टीकोनातून हा मोठा टप्पा समजला जात आहे. इम्म्युनोॲक्टच्या क्लिनिकल ट्रायल अंतर्गत व टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये ५० रुग्णांवर हे उपचार करण्यात आले. यातील दोन रुग्ण एसएमबीटी कॅन्सर इन्स्टिट्यूटमध्ये दाखल करण्यात आले होते. दोन्हीही रुग्णांना चांगले परिणाम बघावयास मिळत असल्याची माहिती मेडिकल ऑन्कोलॉजीस्ट डॉ. लविन विल्सन यांनी दिली.

इम्म्युनोॲक्ट डॉ. राहुल पूरवार यांनी संशोधन केलेली संस्था आहे. टाटा मेमोरियल सेंटरच्या ब्लड कॅन्सरविभागाचे डॉ हसमुख जैन यांच्यासह तज्ञांच्या उपस्थितीत प्रिन्सिपल क्लिनिकलइन्व्हेस्टीगेशन करण्यात आले. जगातील सर्वात महागड्या समजल्या जाणाऱ्या कर्करोग उपचारावर कमीत-कमीखर्चात ब्लड कॅन्सर झालेल्या रुग्णांवर उपचार करणार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून आयआयटी मुंबई व टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये संशोधन सुरु होते.



अखेरीस या उपचार पद्धतीला मान्यता मिळाली असून सुरुवातीला ५० रुग्णांवर हे उपचार करण्यात आले. यातील दोन रुग्ण एसएमबीटी कॅन्सर इन्स्टिट्युटमध्ये दाखल करूनत्यांच्यावर ही थेरपी यशस्वी झाली. जगातील कॅन्सर उपचारावर होत असलेल्या कोट्यवधी रुपयांचा खर्च भारतीय संशोधनामुळे आता लाखांत आला आहे. एसएमबीटी हॉस्पिटल आणि टाटा मेमोरियल हॉस्पिटल यांच्यामध्ये गेल्या दोन वर्षांपूर्वी सामंजस्य करारामुळे टाटा मेमोरियल हॉस्पिटलचे तांत्रिक मार्गदर्शनाने एसएमबीटी कॅन्सर इन्स्टिट्यूट साकारण्यात आले आहे.

Deshdoot Edition
Nov 30, 2023 Page No. 5
Powered by : eReleGo.com

# News Published – 12 Super specialty Depts

लोकमत

## 'एसएमबीटी'मध्ये १२ सुपरस्पेशालिटी विभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**संगमनेर :** नाशिक जिल्ह्यातील धामणगाव-घोटी खुर्द येथील एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये सर्वसामान्य रुग्णांना लाभ होत आहे. येथे असलेल्या अद्ययावत वैद्यकीय उपकरणांमुळे सर्व उपचार व शस्त्रक्रिया करणे शक्य झाले आहे. करुणा आणि सहानुभूती व उपचाराची अचूकता यामुळे रुग्णांची पावले आता एसएमबीटीकडे वळू लागली आहेत.

१२ सुपरस्पेशालिटी विभाग याठिकाणी कार्यान्वित करण्यात आले असून विविध शस्त्रक्रियांसाठी १७ सुसज्ज ऑपरेशन थिएटर्स उभारण्यात आले आहेत. यातील चार ऑपरेशन थिएटर्स पूर्णवेळ सुपरस्पेशालिटी विभागांतर्गत शस्त्रक्रिया केल्या जात आहेत. हे विभाग कार्यान्वित झाल्यामुळे अनेक क्लिष्ट शस्त्रक्रिया याठिकाणी होत आहेत. एकाच छताखाली २५ विभागांच्या सेवा देणारे उत्तर महाराष्ट्रातील एसएमबीटी एकमेव हॉस्पिटल आहे.

हृदयविकार व शस्त्रक्रिया, कर्करोग शस्त्रक्रिया, मुत्रविकार शस्त्रक्रिया, मेंदू व मणकेविकार शस्त्रक्रिया, सांधे प्रत्यारोपण, किडनी व डायलिसिस, प्लास्टिक सर्जरी, इंटर्वेंशनल रेडियोलॉजी, पोटाचे विकार, अवयव प्रत्यारोपण या सुपरस्पेशालिटी उपचारांसाठी रुग्ण उत्तर महाराष्ट्र किंवा ठाणे पालघर परिसरच नव्हे तर वैजापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बुलढाणा, अमरावती, वाशिम जिल्ह्यासह मुंबई, गुजरात व मध्य प्रदेशातून मोठ्या संख्येने दाखल होत आहेत.

समृद्धी महामार्गाने हे रुग्ण अवघ्या काही तासांत रुग्णालय गाठू शकत आहेत. (वा. प्र)

Hello Ahmednagar Gramin
Page No. 2 Dec 18, 2023
Powered by: erelego.com

## 'एसएमबीटी'मध्ये १२ सुपरस्पेशालिटी विभाग कार्यान्वित

### एकाच छताखाली २५ विभागांच्या सेवा देणारे उत्तर महाराष्ट्रातील एकमेव हॉस्पिटल

SMBT

नाशिक, ता. १६ : एसएमबीटी हॉस्पिटलने सतत नव्या तंत्रज्ञानाची कास धरत अनेक अद्ययावत उपकरणे आणली असून, त्यामुळे सुपरस्पेशालिटीतील सर्व उपचार व शस्त्रक्रिया करणे शक्य झाले आहे. करुणा आणि सहानुभूती व उपचारांची अचूकता यामुळे लाखो रुग्णांची पावले आता 'एसएमबीटी'कडे वळू लागली आहेत. तब्बल १२ सुपरस्पेशालिटी विभाग याठिकाणी कार्यान्वित करण्यात आले असून, विविध शस्त्रक्रियांसाठी १७ सुसज्ज ऑपरेशन थिएटर्स उभारण्यात आले आहेत. यातील चार ऑपरेशन थिएटर्समध्ये पूर्णवेळ सुपरस्पेशालिटी विभागांतर्गत शस्त्रक्रिया केल्या जात आहेत. हे विभाग कार्यान्वित झाल्याने अनेक क्लिष्ट शस्त्रक्रिया याठिकाणी होत आहेत. एकाच छताखाली २५ विभागांच्या सेवा देणारे उत्तर महाराष्ट्रातील एसएमबीटी एकमेव हॉस्पिटल आहे.

हृदयविकार व शस्त्रक्रिया, कर्करोग शस्त्रक्रिया, मूत्रविकार शस्त्रक्रिया, मेंदू व मणकेविकार शस्त्रक्रिया, सांधे प्रत्यारोपण, किडनी व डायलिसिस, प्लास्टिक सर्जरी, इंटर्वेंशनल रेडिओलॉजी, पोटाचे विकार, अवयव प्रत्यारोपण या सुपरस्पेशालिटी उपचारांसाठी रुग्ण उत्तर महाराष्ट्र किंवा ठाणे, पालघर परिसरच नव्हे, तर छत्रपती संभाजीनगर, जालना, बुलढाणा, अमरावती, वाशीम, मुंबईसह गुजरात व मध्य प्रदेशातून मोठ्या संख्येने दाखल होत आहेत.

गेल्या तीन वर्षांत सुपरस्पेशालिटी सेवांचा ६९ हजार ७४२ रुग्णांनी लाभ घेतला. त्या खालोखाल आयपीडी म्हणजेच आंतररुग्ण सेवा गेल्या तीन वर्षांत नऊ हजार ६५५ इतकी होती. शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांचा आकडा नऊ हजार ९४७ इतका झाला आहे. यात महात्मा जोतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजना, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत (आभा कार्ड), राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके)धारक रुग्णांची संख्या अधिक होती, त्यांच्यावर मोफत उपचार झाले आहेत. जे आजार योजनेत बसू शकले नाहीत अशा रुग्णांसाठी एसएमबीटी हॉस्पिटलने अतिशय नाममात्र दरात उपचार उपलब्ध करून दिले आहेत. येथील हृदयविकार विभाग उत्तर महाराष्ट्रातील अतिशय अद्ययावत हृदयविकार विभाग समजला जातो.

टाटा मेमोरियल सेंटरच्या तांत्रिक मार्गदर्शनाने कर्करोगावर मोठे काम सुरू आहे. ब्लड कॅन्सरवर भारतीय संशोधन असलेल्या इम्युनोअक्ट व एसएमबीटीचा करार झालेला असून, कारटी-सेल थेरपी पुढील महिन्यापासून याठिकाणी सुरू होईल. न्यूरो मायक्रोस्कोप येथे दाखल झाला आहे. या मायक्रोस्कोपच्या माध्यमातून मेंदू व मणक्याच्या क्लिष्ट शस्त्रक्रिया करणे शक्य झाले. उत्तर महाराष्ट्रात सांधे प्रत्यारोपणासाठी ठराविक रुग्णालयांना योजनेतून मोफत शस्त्रक्रिया करण्याची परवानगी मिळाली, त्यात एसएमबीटी हॉस्पिटलचा समावेश आहे.

**या शस्त्रक्रिया अगदी मोफत**

हृदयविकार, अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी, जन्मजात हृदयविकार, बलून शस्त्रक्रिया, ई-पी स्टडी, पेसमेकर, बायपास, व्हॉल्व्ह दुरुस्ती व बदल, लहान मुलांची ओपन हार्ट सर्जरी, तोंडाचा व जिभेचा कर्करोग, स्तनांचा कर्करोग, गर्भाशय व अंडाशयाचा कर्करोग, जठर व आतड्यांचा कर्करोग, थायरॉईड ग्रंथींचा कर्करोग, मूत्राशयाचा कर्करोग, मेंदूतील गाठींची शस्त्रक्रिया, कवटीचे हाड बसविणे, मणक्यातील नस मोकळी करणे, मणक्यातील नसा व गाठींची शस्त्रक्रिया, पोटातील क्लिष्ट शस्त्रक्रिया, लहान-मोठे आतडे, स्वादुपिंड, जठर, अन्ननलिकेच्या दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया, प्रोटेस्ट ग्रंथींची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया, किडनी स्टोन, मूत्रमार्गातील अडथळे, किडनीची शस्त्रक्रिया, गुडघा- खुबा- सांधे प्रत्यारोपण, दुर्बिणीद्वारे लिगामेंटची शस्त्रक्रिया व सर्व प्रकारच्या फ्रॅक्चरच्या शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत केल्या जातात.



# News Published – 12 Super specialty Depts

## एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये १२ सुपरस्पेशालिटी विभाग कार्यान्वित

### एकाच छताखाली २५ विभागांच्या सेवा देणारे उत्तर महाराष्ट्रातील एकमेव हॉस्पिटल

**नाशिक (प्रतिनिधी):–** एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये गेल्या अनेक वर्षापासून तळागाळातील सर्वसामान्य रुग्णांना लाभ होत आहे. नव्या तंत्रज्ञानाची कास धरत अनेक अद्ययावत उपकरणे याठिकाणी दाखल झाली. त्यामुळे सुपरस्पेशालिटीतील सर्व उपचार व शस्त्रक्रिया करणे शक्य झाले आहे. करूणा आणि सहानुभूती व उपचाराची अचूकता यामुळे लाखो रुग्णांची पावले आता एसएमबीटीकडे वळू लागली आहेत. तब्बल १२ सुपरस्पेशालिटी विभाग याठिकाणी कार्यान्वित करण्यात आले असून विविध शस्त्रक्रियांसाठी १७ सुसज्ज ऑपरेशन थिएटर्स उभारण्यात आले आहेत. यातील चार ऑपरेशन थिएटर्समध्ये पूर्णवेळ सुपरस्पेशालिटी विभागांतर्गत शस्त्रक्रिया केल्या जात आहेत. हे विभाग कार्यान्वित झाल्यामुळे अनेक क्लिष्ट शस्त्रक्रिया याठिकाणी होत आहेत. एकाच छताखाली २५ विभागांच्या सेवा देणारे उत्तर महाराष्ट्रातील एसएमबीटी एकमेव हॉस्पिटल आहे.



हृदयविकार शस्त्रक्रिया, कर्करोग शस्त्रक्रीया, मूत्रविकार शस्त्रक्रीया, मेंदू व मणकेविकार शस्त्रक्रिया, सांधे प्रत्यारोपण, किडनी व डायलिसिस, प्लास्टिक सर्जरी, इंटर्वेंशनल रेडियोलॉजी, पोटाचे विकार, अवयव प्रत्यारोपण या सुपरस्पेशालिटी उपचारांसाठी रुग्ण उत्तर महाराष्ट्र किंवा ठाणे, पालघर परिसरच नव्हे तर वैजापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बुलढाणा, अमरावती, वाशीम जिल्ह्यासह मुंबई, गुजरात व मध्यप्रदेशातून मोठ्या संख्येने दाखल होत आहेत. समृद्धी महामार्गाने हे रुग्ण अवघ्या काही तासांत रुग्णालय गाठू शकत आहेत.

गेल्या तीन वर्षात सुपर स्पेशालिटी सेवांचा ६९ हजार ७४२ रुग्णांनी लाभ घेतला. त्याखालोखाल आयपीडी म्हणजेच आंतररुग्ण सेवा गेल्या तीन वर्षांत ९ हजार ६५५ इतकी होती. शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांचा आकडा ९ हजार ९४७ इतका झाला आहे. विशेष म्हणजे, यामध्ये महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजना, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना व आयुष्यमान भारत (आभा कार्ड), राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) धारक रुग्णांची संख्या अधिक होती आणि त्यांच्यावर मोफत उपचार झाले आहेत. जे आजार योजनेत बसू शकले नाहीत, अशा रुग्णांसाठी एसएमबीटी हॉस्पिटलने अतिशय नाममात्र दरांत उपचार उपलब्ध करून दिले आहेत. येथील हृदयविकार विभाग उत्तर महाराष्ट्रातील अतिशय अद्ययावत हृदयविकार विभाग समजला जातो. विविध ठिकाणी मोफत शिबिरे आयोजित केली जातात, शिवाय अनेक क्लिष्ट हृदयविकार शस्त्रक्रिया याठिकाणी होत आहेत. तसेच लहान मुलांच्या हृदयविकारावर मोठे काम होत असून मोफत दर महिन्याच्या शेवटच्या शनिवारी आणि रविवारी याठिकाणी विशेष शिबिराचे आयोजन केले जाते.

हृदयविकाराचे एक स्वतंत्र युनिट सुरु करण्यात आले असून नामवंत हृदयविकार तज्ज्ञांची पूर्णवेळ उपस्थिती याठिकाणी उपलब्ध आहे.

टाटा मेमोरियल सेंटरच्या तांत्रिक मार्गदर्शनाने गेल्या दोन वर्षांपासून एसएमबीटी कॅन्सर इन्स्टीट्युट कर्करोगावर मोठे काम करीत आहे. तब्बल बारा हजारापेक्षा अधिक रुग्णांवर आतापर्यंत उपचार झाले आहेत. गेल्या दोन वर्षांत ऑन्कोसर्जरी, तोंडाची सर्जरी, ब्रेस्ट सर्जरी, न्यूरो सर्जरी तसेच मेडिकल ऑन्कोलॉजी केमोरेपी, इम्युनोथेरेपी, हार्मोनल थेरपी करण्यात येत आहे. तब्बल १० हजारांपेक्षा अधिक कर्करोगग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार करण्यात यश आले आहेत. ब्लड कॅन्सरवर भारतीय संशोधन असलेल्या इम्म्यूनोअक्ट व एसएमबीटीचा करार झालेला असून कारटी–सेल थेरपी पुढील महिन्यापासून याठिकाणी सुरु होणार आहे.

अतिशय अद्यायवत समजला जाणारा न्युरो मायक्रोस्कोप एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये दाखल झाला आहे. या मायक्रोस्कोपच्या माध्यमातून मेंदू व मणक्याच्या क्लिष्ट शस्त्रक्रिया करणे शक्य झाले आहे. विशेष म्हणजे, या सर्व शस्त्रक्रिया या योजनेद्वारे मोफत होत आहेत. पूर्णवेळ तज्ञ आणि अनुभवी डॉक्टर याठिकाणी उपलब्ध असल्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत असलेल्या रुग्णांवर तत्काळ उपचार केले जात आहेत. मूत्राशय सतत भरल्यासारखे वाटणे, सतत लघवीला येणे, मूत्रोत्सर्जन करताना वेदना होणे, दाह होणे, लघवीचा रंग गडद असणे, लघवीमध्ये रक्ताचे प्रमाण असणे, लघवीचा उग्र वास येणे, महिलांच्या ओटीपोटात दुखणे असे मुत्ररोगावरील प्रत्येक आजारावर उपचार एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये उपलब्ध आहेत. याठिकाणी अनुभवी मूत्रपिंडरोगतज्ञ पूर्णवेळ सेवा देत आहेत.

एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये सुसज्ज किडनी व डायलिसीस विभाग कार्यरत आहे. या ठिकाणी योजनेत हे उपचार मोफत होत आहेत. यासोबतच किडनी व यकृत (लिव्हर) प्रत्यारोपण सुरु झाल्यामुळे मुंबई पुण्यासारख्या ठिकाणी न जाता सर्व उपचार या ठिकाणी उपलब्ध झाले आहेत. प्लास्टिक सर्जरीदेखील याठिकाणी सुरु असून तज्ज्ञ सर्जन या ठिकाणी उपलब्ध आहेत.

उत्तर महाराष्ट्रात सांधे प्रत्यारोपणासाठी ठराविक रुग्णालयांना योजनेतून मोफत शस्त्रक्रिया करण्याची परवानगी करण्यासाठी खूप कमी रुग्णालयांना योजनेतून मोफत करण्यासाठी परवानगी मिळाली आहे. त्यात एसएमबीटी हॉस्पिटलचा समावेश असल्यामुळे याठिकाणी मोठ्या संख्येने रुग्णांवर शस्त्रक्रिया होत आहेत. यासोबतच टूडी इको, कार्डियाक स्ट्रेस टेस्ट, कलर डॉप्लर, अत्याधुनिक रेडिओलॉजी व पॅथॉलॉजी विभागात डायलिसिस, एमआरआय, सीटी–स्कॅन, एक्स–रे, सोनोग्राफी, मॅमोग्राफी, इसीजी, ईईजी, इएमजी, पीएफटी या चाचण्या केल्या जातात.

**या शस्त्रक्रिया अगदी मोफत**–हृदयविकार, अन्जिओग्राफी अन्जिओप्लास्टी, जन्मजात हृदयविकार, बलून शस्त्रक्रिया, ई–पी स्टडी, पेसमेकर, बायपास, वॉल्व्ह दुरुस्ती व बदल, लहान मुलांची ओपन हार्ट सर्जरी, तोंडाचा, जिभेचा कर्करोग, स्तनांचा कर्करोग, गर्भाशय व अंडाशयाचा कर्करोग, जठर व आतड्यांचा कर्करोग, थायरॉईड ग्रंथींचा कर्करोग, मूत्राशयाचा कर्करोग, मेंदूतील गाठींची शस्त्रक्रिया, कवटीचे हाड बसवणे, मणक्यातील नस मोकळी करणे, मणक्यातील नसा व गाठींची शस्त्रक्रिया, पोटातील क्लिष्ट शस्त्रक्रिया, लहान–मोठे आतडे, स्वादुपिंड, जठर, अन्ननलिकेच्या दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया, प्रोस्टेट ग्रंथींची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया, किडनीस्टोन, मूत्रमार्गातील अडथळे, किडनीची शस्त्रक्रिया, गुडघा–खुबा सांधे प्रत्यारोपण, दुर्बिणीद्वारे लिगामेंटची शस्त्रक्रिया व सर्व प्रकारचे फ्रॅक्चर शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत केल्या जातात.

**२५ विभागांच्या सेवा एकाच छताखाली**– एकाच छताखाली २५ वेगवेगळया विभागांच्या स्पेशालिटी आणि सुपर स्पेशालिटी सेवा देणारे एसएमबीटी उत्तर महाराष्ट्रातील एकमेव हॉस्पिटल आहे. विशेष म्हणजे, प्रत्येक विभागात तज्ज्ञ आणि अनुभवी डॉक्टर्स पूर्णवेळ उपलब्ध असून येथे येणाऱ्या प्रत्येक रुग्णावर योग्य उपचार केले जात आहेत.



## 'जोगेश्वरीचा पती भैरवनाथ' मालिकेचे १०० भाग पूर्ण

**नाशिक (प्रतिनिधी):–** शेमारू मराठीबाणावरील 'जोगेश्वरीचा पती भैरवनाथ' या आकर्षक कथेत, जोगेश्वरी आणि भैरवनाथ एका परिवर्तनीय भावनिक प्रवासाला सुरुवात करत असताना कथानक एक आनंददायी वळण घेते. मालिकेच्या लोकप्रियतेने सीमारेषा ओलांडली आहे व संपूर्ण महाराष्ट्रातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचली आहे. या मालिकेने नुकतेच १०० भाग पूर्ण केल्यामुळे, या आनंदाच्या क्षणी, जोगेश्वरी (क्षमा देशपांडे), महादेव (रोहन एक्के), पार्वती (श्वेता नाईक), नंदी (सुप्रीत निकम) या कलाकारांनी खरसुंडी गावातील ऐतिहासिक सिद्धनाथ मंदिराला भेट दिली.

सांगली जिल्ह्यातील सिद्धनाथ हे भगवान शंकराचे रूप मानले जाते. 'जोगेश्वरीचा पती भैरवनाथ' या मालिकेमधील पात्रांना लोकप्रियता मिळाल्याने लोकांनी त्यांना ओळखले आणि त्यांच्या प्रेमात वाढलेल्या पात्रांचे कौतुकही केले. अभिनेत्री क्षमा देशपांडे, तिच्या चाहत्यांसोबतच्या एका अविस्मरणीय भेटीबद्दल प्रतिबिंबित करताना, तिचा उत्साह व्यक्त करताना म्हणाली, आमच्या शोचे १०० भाग पूर्ण करणे हा एक आनंदाचा टप्पा आहे आणि सिद्धनाथ मंदिराची आमची भेट हा एक दैवी अनुभव होता. आम्ही सकारात्मक उर्जेने घेरलो होतो. ती पुढे म्हणते, ''खरसुंडीमधली भेट ही केवळ एक सहल नव्हती. आमच्या चाहत्यांचे आमच्याबद्दल असलेले प्रेम, आपुलकी आणि कौतुक हा एक मनसोक्त अनुभव होता. आमच्या पात्रांनी पडद्यावर केवळ चाहत्यांची मने जिंकली नाहीत तर, त्यांची जाणीव करून दिली आहे. खरसुंडी सोडून आम्ही केवळ सिद्धनाथांचे आशीर्वाद घेत नाही तर आठवणीही जपत आहोत.''

# News Published – 12 Super specialty Depts.

४ पुण्यनगरी | रविवार, १७ डिसेंबर २०२३ | नाशिक

## 'एसएमबीटी'त १२ सुपरस्पेशालिटी विभाग कार्यान्वित

### एकाच छताखाली २५ विभागांच्या सेवा देणारे उत्तर महाराष्ट्रातील एकमेव हॉस्पिटल



**नाशिक :** एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये तब्बल १२ सुपरस्पेशालिटी विभाग कार्यान्वित करण्यात आले असून विविध शस्त्रक्रियांसाठी १७ सुसज्ज ऑपरेशन थिएटर्स उभारण्यात आले आहेत. यातील चार ऑपरेशन थिएटर्समध्ये पूर्णवेळ सुपरस्पेशालिटी विभागांतर्गत शस्त्रक्रिया केल्या जातात. या विभागांमुळे अनेक क्लिष्ट शस्त्रक्रिया याठिकाणी होत आहेत.

एकाच छताखाली २५ विभागांच्या सेवा देणारे उत्तर महाराष्ट्रातील एसएमबीटी एकमेव हॉस्पिटल आहे. हृदयविकार व शस्त्रक्रिया, कर्करोग, मूत्रविकार, मेंदू व मणकेविकार शस्त्रक्रिया, सांधे प्रत्यारोपण, किडनी व डायलिसिस, प्लास्टिक सर्जरी, पोटाचे विकार, अवयव प्रत्यारोपण या सुपरस्पेशालिटी उपचारांसाठी महाराष्ट्रासह गुजरात व मध्यप्रदेशातून मोठ्या प्रमाणात रुग्ण या ठिकाणी येतात. गेल्या तीन वर्षात सुपर स्पेशालिटी सेवांचा ६९ हजार ७४२ रुग्णांनी लाभ घेतला. त्याखालोखाल आंतररुग्ण सेवा गेल्या तीन वर्षांत ९ हजार ६५५ इतकी होती. शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांचा आकडा ९ हजार ९४७ झाला आहे. महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजना, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना व आयुष्यमान भारत आदी योजनांतून रुग्णांवर मोफत उपचार झाले आहेत. तसेच जे आजार या योजनांमध्ये येत नाहीत, अशा रुग्णांसाठी एसएमबीटी हॉस्पिटलने नाममात्र दरात उपचार उपलब्ध करून दिले आहेत.

टाटा मेमोरियल सेंटरच्या तांत्रिक मार्गदर्शनाने एसएमबीटी कॅन्सर इन्स्टिट्यूट कर्करोगावर उपचाराचे काम करीत आहे. गेल्या दोन वर्षांत ऑन्कोसर्जरी, तोंडाची सर्जरी, ब्रेस्ट सर्जरी, न्यूरो सर्जरी तसेच मेडिकल ऑन्कोलॉजी केमोरेपी, इम्युनोथेरेपी, हार्मोनल थेरपी करण्यात येत आहे. ब्लड कॅन्सरवर भारतीय संशोधन असलेल्या इम्म्यूनोअक्ट व एसएमबीटीचा करार झाला असून कारटी-सेल थेरपी पुढील महिन्यापासून सुरू होणार आहे. अतिशय अद्यायवत समजला जाणारा न्यूरो मायक्रोस्कोप एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये दाखल झाला आहे. या मायक्रोस्कोपच्या माध्यमातून मेंदू व मणक्याच्या क्लिष्ट शस्त्रक्रिया करणे शक्य झाले आहे. विशेष म्हणजे, या सर्व शस्त्रक्रिया या योजनेद्वारे मोफत होत आहेत.

#### या शस्त्रक्रिया मोफत

- हृदयविकार, ॲन्जिओग्राफी ॲन्जिओप्लास्टी, जन्मजात हृदयविकार, बलून शस्त्रक्रिया, ई-पी स्टडी, पेसमेकर, बायपास, वॉल्व्ह दुरुस्ती व बदल, लहान मुलांची ओपन हार्ट सर्जरी, तोंडाचा, जिभेचा कर्करोग, स्तनांचा कर्करोग, गर्भाशय व अंडाशयाचा कर्करोग, जठर व आतड्यांचा कर्करोग, थायरॉईड ग्रंथींचा कर्करोग मूत्राशयाचा कर्करोग, मेंदूतील गाठींची शस्त्रक्रिया, कवटीचे हाड बसवणे, मणक्यातील नस मोकळे करणे, मणक्यातील नसा व गाठींची शस्त्रक्रिया, पोटातील क्लिष्ट शस्त्रक्रिया, लहान-मोठे आतडे, स्वादुपिंड, जठर, अन्ननलिकेच्या दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया, प्रोस्तेत ग्रंथींची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया, किडनीस्टोन, मूत्रमार्गातील अडथळे, किडनीची शस्त्रक्रिया, गुडघा-खुबा सांधे प्रत्यारोपण, दुर्बिणीद्वारे लिगामेंटची शस्त्रक्रिया व सर्व प्रकारचे फ्रॅक्चर शस्त्रक्रिया मोफत केल्या जातात.

---

देशदूत

## एसएमबीटीमध्ये १२ सुपरस्पेशालिटी विभाग कार्यान्वित

### एकाच छताखाली सेवा देणारे उत्तर महाराष्ट्रातील एकमेव हॉस्पिटल

**नाशिक । दि. १७ प्रतिनिधी**

एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून तळागाळातील सर्वसामान्य रुग्णांना लाभ होत आहे. नव्या तंत्रज्ञानाची कास धरत अनेक अद्ययावत उपकरणे याठिकाणी दाखल झाले. त्यामुळे सुपर स्पेशालिटीतील सर्व उपचार व शस्त्रक्रिया करणे शक्य झाले आहे. करुणा आणि सहानुभूती व उपचाराची अचूकता यामुळे लाखो रुग्णांची पावले आता एसएमबीटीकडे वळू लागली आहेत. तब्बल १२ सुपर स्पेशालिटी विभाग याठिकाणी कार्यान्वित करण्यात आले असून विविध शस्त्रक्रियांसाठी १७ सुसज्ज ऑपरेशन थिएटर्स उभारण्यात आले आहेत. यातील चार ऑपरेशन थियेटर्समध्ये पूर्णवेळ सुपरस्पेशालिटी विभागांतर्गत शस्त्रक्रिया केल्या जात आहेत. हे विभाग कार्यान्वित झाल्यामुळे अनेक क्लिष्ट शस्त्रक्रिया याठिकाणी होत आहेत. एकाच छताखाली २५ विभागांच्या सेवा देणारे उत्तर महाराष्ट्रातील एसएमबीटी एकमेव हॉस्पिटल आहे.

हृदयविकार व शस्त्रक्रिया, कर्करोग शस्त्रक्रीया, मूत्रविकार शस्त्रक्रीया, मेंदू व मणकेविकार शस्त्रक्रिया,सांधे प्रत्यारोपण, किडनी व डायलिसिस, प्लास्टिक सर्जरी, इंटर्वेशनल रेडियोलॉजी, पोटाचे विकार, अवयव प्रत्यारोपण या सुपरस्पेशालिटी उपचारांसाठी रुग्ण उत्तर महाराष्ट्र किंवा ठाणे पालघर परिसरच नव्हे तर वैजापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बुलढाणा, अमरावती, वाशीम जिल्ह्यासह मुंबई, गुजरात व मध्यप्रदेशातून मोठ्या संख्येने दाखल होत आहेत. समृद्धी महामार्गाने हे रुग्ण अवघ्या काही तासांत रुग्णालय गाठू शकत आहेत.

गेल्या तीनवर्षात सुपर स्पेशालिटी सेवांचा ६९ हजार ७४२रुग्णांनी लाभ घेतला. त्याखालोखाल आयपीडी म्हणजेच आंतररुग्ण सेवा गेल्या तीन वर्षांत ९ हजार ६५५ इतकी होती. शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांचा आकडा ९ हजार ९४७इतका झाला आहे. विशेष म्हणजे, यामध्ये महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजना, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना व आयुष्यमान भारत (आभा कार्ड), राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) धारक रुग्णांची संख्या अधिक होती आणि त्यांच्यावर मोफत उपचार झाले आहेत. जे आजार योजनेत बसू शकले नाहीत अशा रुग्णांसाठी एसएमबीटी हॉस्पिटलने अतिशय नाममात्र दरांत उपचार उपलब्ध करून दिले आहेत.

गेल्या दोन वर्षांत ऑन्कोसर्जरी, तोंडाचीसर्जरी, ब्रेस्ट सर्जरी, न्यूरो सर्जरीतसेच मेडिकल ऑन्कोलॉजी केमोरेपी, इम्युनोथेरेपी, हार्मोनल थेरपी करण्यात येत आहे.तब्बल १० हजारांपेक्षा अधिक कर्करोगग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार करण्यात यश आले आहेत. ब्लड कॅन्सरवर भारतीय संशोधन असलेल्या इम्म्यूनोअक्ट व एसएमबीटीचा करार झालेला असून कारटी-सेल थेरपी पुढील महिन्यापासून याठिकाणी सुरु होणार आहे.



#### २५ विभागांच्या सेवा एकाच छताखाली

एकाच छताखाली २५ वेगवेगळ्या विभागांच्या स्पेशालिटी आणि सुपर स्पेशालिटी सेवा देणारे एसएमबीटी उत्तर महाराष्ट्रातील एकमेव हॉस्पिटल आहे. विशेष म्हणजे, प्रत्येक विभागात तज्ञ आणि अनुभवी डॉक्टर्स पूर्णवेळ उपलब्ध असून येथे येणाऱ्या प्रत्येक रुग्णांवर योग्य उपचार केले जात आहेत.

Deshdoot Edition
Dec 18, 2023 Page No. 7
Powered by : eReleGo.com

# News Published – 12 Super specialty Depts.

## 'एसएमबीटी'मध्ये बारा सुपर स्पेशालिटी विभाग कार्यान्वित

**लोकनामा प्रतिनिधी**

### एकाच छताखाली २५ सेवा; उत्तर महाराष्ट्रातील एकमेव हॉस्पिटल

**नाशिक** : आधुनिक उपचारांमुळे लाखो रुग्णांची पावले आता एसएमबीटी हॉस्पिटलकडे वळू लागली आहेत. तब्बल १२ सुपर स्पेशालिटी विभाग याठिकाणी कार्यान्वित करण्यात आले असून, विविध शस्त्रक्रियांसाठी १७ सुसज्ज ऑपरेशन थिएटर्स उभारण्यात आले आहेत. यातील चार ऑपरेशन थिएटर्समध्ये पूर्णवेळ सुपर स्पेशालिटी विभागांतर्गत शस्त्रक्रिया केल्या जात आहेत.अनेक क्लिष्ट शस्त्रक्रिया याठिकाणी होत आहेत. एकाच छताखाली २५ विभागांच्या सेवा देणारे उत्तर महाराष्ट्रातील एसएमबीटी एकमेव हॉस्पिटल आहे.



गेल्या तीन वर्षांत सुपर स्पेशालिटी सेवांचा ६९ हजार ७४२रुग्णांनी लाभ घेतला.त्याखालोखाल आयपीडी म्हणजेच आंतररुग्ण सेवा गेल्या तीन वर्षांत नऊ हजार ६५५ इतकी होती. शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांचा आकडा नऊ हजार ९४७ इतका झाला आहे. विशेष म्हणजे, यामध्ये महात्मा जोतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजना, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत (आभा कार्ड), राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके)धारक रुग्णांची संख्या अधिक होती आणि त्यांच्यावर मोफत उपचार झाले आहेत. जे आजार योजनेत बसू शकले नाहीत, अशा रुग्णांसाठी एसएमबीटी हॉस्पिटलने अतिशय नाममात्र दरांत उपचार उपलब्ध करून दिले आहेत.

गेल्या दोन वर्षांत ऑन्को सर्जरी, तोंडाची सर्जरी, ब्रेस्ट सर्जरी, न्यूरो सर्जरी, तसेच मेडिकल ऑन्कोलॉजी केमो थेरपी, इम्युनो थेरपी, हार्मोनल थेरपी करण्यात येत आहेत.तब्बल १० हजारांपेक्षा अधिक कर्करोगग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार करण्यात यश आले आहेत.ब्लड कॅन्सरवर इम्म्यूनोअक्ट व एसएमबीटीचा करार झालेला असून, कारटी-सेल थेरपी पुढील महिन्यापासून याठिकाणी सुरू होणार आहे.उत्तर महाराष्ट्रात सांधे प्रत्यारोपणासाठी ठराविक रुग्णालयांना योजनेतून मोफत शस्त्रक्रिया करण्याची परवानगी मिळाली आहे. यासोबतच टूडी इको, कार्डियाक स्ट्रेस टेस्ट, कलर डॉप्लर, अत्याधुनिक रेडिओलॉजी व पॅथॉलॉजी विभागात, डायलिसिस, एमआरआय, सीटी-स्कॅन, एक्स-रे, सोनोग्राफी, मॅमोग्राफी, इसीजी, ईईजी, इएमजी, पीएफटी या चाचण्या केल्या जातात.

# News Published – 12 Super specialty Depts.

LOKMAT TIMES

LOKMAT TIMES • **Anchor**

## 12 super-specialty departments operational at SMBT hospital

Special treatments and surgeries are performed here under one roof



**Lokmat News Network**
NASHIK, DEC 19

Many needy patients have been receiving treatments at SMBT hospital for several years now. The hospital is always updated with new technology. Modern medical equipment required for the treatment of various diseases are present here. Several special treatments and surgeries are performed at this hospital. There are 12 Super Speciality Departments at SMBT, where patients receive treatments, and it has 17 well-equipped operation theatres for different surgeries. SMBT is the only hospital in north Maharashtra that offers treatments on various diseases under one roof. It has a total of 25 departments.

Patients who come here are not only from north Maharashtra but also from other locations such as Vaijapur, Chhatrapati Sambhaji Nagar, Jalna, Buldhana, Amravati, Washim, Mumbai, Gujarat, and Madhya Pradesh.

Over the past three years, SMBT hospital has provided treatments to 69,742 patients, with 9,655 patients receiving care in the Inpatient Department (IPD). Additionally, 9,947 patients underwent surgeries here. Notably, the majority of these patients have benefited from government health schemes such as Mahatma Jyotiba Phule Jeevandayee Arogya Yojana, Pradhan Mantri Jan Arogya Yojana, Ayushman Bharat (Abha Card), and Rashtriya Bal Swasthya Karyakram (RBSK), allowing them to receive treatment free of charge.

SMBT hospital treats children with heart diseases, it also organises special health check-up camps on the last Saturday and Sunday of every month free of charge.

### Following surgeries are performed at the hospital

Surgeries, including Heart Disease, Angiography Angioplasty, Congenital Heart Disease, Gastric Balloon Surgery, Pacemaker, Bypass, Heart Valve Treatment and Replacement, Pediatric Open Heart Surgery, Mouth and Tongue Cancer, Breast Cancer, Uterus and Ovarian Cancer, Stomach and Bowel Cancer, Thyroid Cancer, Bladder Cancer, Brain Tumour Surgery, Intramembranous Ossification, Spinal Nerve Unclumping, Spinal Nerve and Tumour Surgery, Complex Abdominal Surgery, Small and Large Bowel, Pancreas and Esophageal Surgery, Prostate Surgery, Kidney Stones, Urinary Tract Obstruction, Kidney Surgery, Knee - Joint Transplant, ligament Surgery, and all types of Fracture Surgeries, are done completely free of charge at SMBT hospital.

Nashik First
Page No. 3 Dec 20, 2023
Powered by: erelego.com

दिव्य मराठी नाशिक सिटी 17-12-2023

## एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये १२ विभाग कार्यान्वित

**नाशिक** | एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये १२ सुपर स्पेशालिटी विभाग कार्यान्वित करण्यात झाले आहेत. विविध शस्त्रक्रियांसाठी १७ सुसज्ज शस्त्रक्रिया विभाग उभारले आहेत. यातील ४ विभागांत पूर्णवेळ सुपर स्पेशालिटी विभागांतर्गत शस्त्रक्रिया होत आहेत.

गेल्या तीन वर्षात सुपर स्पेशालिटी सेवांचा ६९ हजार ७४२ रुग्णांनी लाभ घेतला. यामध्ये महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजना, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना व आयुष्यमान भारत (आभा कार्ड), राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) या योजनेंतर्गत रुग्णांवर मोफत उपचार झाले आहेत. येथील हृदयविकार विभागात दर महिन्याच्या शेवटच्या शनिवार, रविवारी मोफत शिबिर होते.

**या शस्त्रक्रिया मोफत :** हृदयविकार, अन्जिओग्राफी अन्जिओप्लास्टी, जन्मजात हृदयविकार, बलून शस्त्रक्रिया, ई-पीस्टडी, पेसमेकर, बायपास, वॉल्व्ह दुरुस्ती व बदल, लहान मुलांची ओपन हार्टसर्जरी, तोंड, जीभ, स्तन, गर्भाशय व अंडाशयाचा कर्करोग आदी.